# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १६/०४/२०२४ (मंगळवार) दुपार

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई
### वाहनासह एकुण ३५४०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १५/०४/२०२४ चे १३.१५ वा. ते १४.०० वा. दरम्यान कार्यालय उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर येथील स्टाफ मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे आदेशाने पोस्टे खापा परिसरात पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, मौजा वाघोली येथुन कोथुळना गावाकडे येणाऱ्या रोडने एका ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून स्टाफने मौजा कोथुळना गावापासुन अंदाजे ८०० मीटर अंतरावर कोथुळना ते वाघोली रोडवर जावुन स्टाफने नाकाबंदी केली असता ट्रॅक्टरला जोडुन असलेल्या ट्रॉली क्र. एम. एच—३१/ए. एच—१६१३ ची पाहणी केली असता ट्रॅक्टर ट्रॉलीचा **चालक आरोपी नामे— आकाश उपासराव भोंडे, वय २६ वर्ष, रा. महादुला पो देहेगाव जोशी ता. पारशिवनी जि. नागपुर** यांनी आपल्या ताब्यातील वाहनामध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातुन नंबर प्लेट नसलेला ट्रॅक्टर किंमती २५,००००/—रू. व ट्रॉली क्र. एम. एच—३१/ए.एच—१६१३ किंमती १०००००/—रू. मध्ये ०१ ब्रास रेती गौणखनिज किंमती ४०००/—रू. असा एकुण ३५४०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे—मपोहवा संगिता कोवे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर विभाग सावनेर यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे **आरोपी चालक नामे—१) आकाश उपासराव भोंडे, वय २६ वर्ष, रा. महादुला पो देहेगाव जोशी ता. पारशिवनी जि. नागपुर व मालक नामे— धनराज लक्ष्मण भोयर रा. वाघोली ता. सावनेर जि. नागपूर** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली मपोहवा संगिता कोवे, पोलीस अंमलदार नितेश पुसाम, मपोशि अश्विनी वांढरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर